नागरी सहकारी बँकांना एकरकमी कर्ज परतफेड योजना लागु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक- २६ फेब्रुवारी, २०१८

**वाचा:-** शासन निर्णय क्रमांकः युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दिनांक १५.११.२०१७

**शुद्धीपत्रक :-**

नागरी सहकारी बँकांना एकरकमी कर्ज परतफेड योजनेस संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील खालील मुद्द्यांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | परिशिष्ट अ मधील मुद्दा क्र. | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|
| १ | ३(इ) | " पगारदारांच्या मालकांशी जर पगारकपातीचा करार झाला असेल तर अशा पगारदारांना दिलेल्या खावटी कर्जांसाठी सदर योजना लागू होणार नाही. " यापुढे खालील प्रमाणे वाचावे.<br>अपवाद - एखादी पगारदार कर्मचाऱ्यांची कंपनी आस्थापना जर बंद झाली असेल अथवा कर्मचारी कपात योजनेनुसार (Employee Retrenchment) जर कर्जदार / जामीनदार यांची नोकरी संपुष्टात आणण्यात आली असेल तर अशा पगारदारांच्या कर्ज प्रकरणांना सदर योजना लागू राहील. तसेच जर पगारदार कर्मचारी (कर्जदार) मयत झाला असेल, तर अशा पगारदार कर्जप्रकरणांनादेखील सदर योजना लागू राहील. |
| २ | ३(ह) | मुळ तरतूद रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे:-<br>एकरकमी कर्ज परतफेड योजनेनुसार तडजोडीची रक्कम जर रु. १० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा कर्जप्रकरणांना सदर योजना लागू करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील. |
| ३ | क्र.६ मधील तक्ता अ.क्र.२ | संशयीत-१ (Doubtful-१) चा कालावधी " संशयीत-१ झाल्यानंतर १२ महिने " ऐवजी " सबस्टॅन्डर्ड झाल्यानंतर १२ महिने " असे वाचावे. |
| ४ | क्र.६(क) | मुळ तरतूद रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे:-<br>तडजोड रक्कम परिशिष्ट ब-१ प्रमाणे निश्चित करावी व तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेंतर्गत बंद करावे. |

| | | |
|---|---|---|
| ५ | क्र.६(ड) | मुळ तरतूद रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे:-<br>१) संशयीत -३ (Doubtful-३) किंवा बुडीत कर्जखात्याची येणेबाकी काढताना संशयीत-१ (Doubtful-१) च्या मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे. ८% व्याजदराने सरळव्याज पद्धतीने डी-३ पर्यंतच्या कालावधीसाठी व्याजाची आकारणी करावी व त्यामध्ये डी-१ च्या तारखेचे व्याज मिळवावे व परिशिष्ट ब-१ अनुसार तडजोड रक्कम निश्चित करावी.<br>२) जर तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेंतर्गत बंद करावे. |
| ६ | क्र.६(इ) | मुळ तरतूद रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे:-<br>१) तडजोड रक्कम परिशिष्ट ब-२ प्रमाणे निश्चित करावी.<br>२) जर तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेंतर्गत बंद करावे. |

उपरोक्त प्रस्तावित सुधारणेमध्ये नमूद करण्यात आलेल्या परिशिष्ट ब-१ मध्ये - संशयीत-३ (Doubtful-३) बुडीत कर्ज खात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र ◦ व परिशिष्ट ब-२ मध्ये - मयत कर्जदाराच्या खात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र ◦ नमूद करण्यात आलेले असून सदर दोन्ही परिशिष्टे शासन निर्णयामध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत.

शासन निर्णय क्रमांक: युआरबी- युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दि.१५.११.२०१७ अन्वये वरील प्रमाणे करण्यात आलेल्या सुधारणांव्यतिरिक्त इतर आदेश कायम आहेत.

सदर शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०२२६१५१५५७२८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.02.26 15:17:06 +05'30'

( रमेश शिंगटे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रती,**

१. सर्व मा. विधान सभा सदस्य / मा. विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई ०३२.
२. मुख्य महाव्यवस्थापक (नागरी बँका), भारतीय रिझर्व्ह बँक, सेंन्ट्रल ऑफीस, १ ला मजला, गारमेंट हाऊस, वरळी, मुंबई-१८
३. उपमुख्य सरव्यवस्थापक, भारतीय रिझर्व्ह बँक, सेंन्ट्रल ऑफीस, १ ला मजला, गारमेंट हाऊस, वरळी, मुंबई-१८
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
६. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

७. मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, दि महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बँक फेडरेशन,लि.,भारतीय क्रिडा मंदिर,४ था मजला,पीबीनं ७१२०,वडाळा,मुंबई- ०३१ .
८. अध्यक्ष, दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. बँक असोसिएशन लि. मुंबई.
९. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई त्यांना विनंती करण्यात येते की, सदरहु शासन निर्णयास व्यापक प्रसिध्दी द्यावी.
१०.निवड नस्ती.

**प्रत:-** माहितीस्तव,

११.मा. मंत्री (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२.
१२.मा. राज्यमंत्री (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२
१३.मा. अ.मु.स. (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

## नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेचे परिशिष्ट- ब(१)

(शासन निर्णय क्र. युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दिनांक २६.२.२०१८ सोबतचे संशयीत-३ (Doubtful-३) बुडीत कर्ज खात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र)

**उदाहरण:-**

| अ.क्र. | कर्जदाराची कर्जखाती | | अनुत्पादक कर्जे |
|---|---|---|---|
| १) | मुदत कर्ज | रु.५.०० लाख | रु.५.०० लाख |
| २) | खेळते भांडवल | रु.३.०० लाख | --- |
| ३) | बील डिस्काऊंटींग | रु.१.०० लाख | --- |
| | एकूण कर्ज | रु.९.०० लाख | रु.५.०० लाख |

(**टिप**:- रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलर क्रमांक १२ दिनांक १.७.२०१५ नुसार वरील सर्व खाती समुह योजनेंतर्गत अनुत्पादक ठरतात तरी देखील प्रत्यक्ष अनुत्पादक असलेल्या मुदत कर्ज खात्यासच एकरकमी कर्ज परतफेड योजनेची सवलत मिळेल.)

| | |
|---|---|
| D-१ चे मुद्दल :- | रु.५.०० लाख |
| अधिक | |
| D-१ चे येणे व्याज :- | रु. १.०० लाख |
| D-१ चे एकूण येणे :- | रु.६.०० लाख (अ) |
| अधिक | |
| रु. ५.०० लाखावर (म्हणजेच केवळ मुद्दलावरच) D-१ पासून D-३ पर्यंत दसादशे ८% दराने सरळव्याज (अंदाजे) :- | रु.१.५० लाख |
| D-३ दिनांका अखेरची येणे बाकी :- | रु. ७.५० लाख |

अधिक

**अ.** जाहीरात खर्च :- रु.०.१० लाख

**ब.** विमा खर्च :- रु.०.०५ लाख

**क.** न्यायालयीन बाबीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च :-रु. ०.३५ लाख

एकूण खर्च रक्कम :- रु. ०.५० लाख

एकूण येणे :- रु. ८.०० लाख (ब)

वजा

D-१ चे नंतर तडजोडच्या तारखेपर्यंत कर्जदाराने बँकेत भरणा केलेली रक्कम :- रु. १.५० लाख

तडजोड रक्कम :- रु. ६.५० लाख (क)

{**टीप**:- **१**) वर कलम (अ) मधील रक्कमेच्या ५% रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे.}

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.02.26 15:17:22 +05'30'

**(रमेश शिंगटे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

## नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेचे परिशिष्ट- ब (२)

(शासन निर्णय क्र. युआरबी-१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स, दिनांक २६.२.२०१८ सोबतचे मयत कर्जदाराच्या खात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र)

**उदाहरण**:-

| अ.क्र. | कर्जदाराची कर्जखाती | | अनुत्पादक कर्जे |
|---|---|---|---|
| १) | मुदत कर्ज | रु.५.०० लाख | रु.५.०० लाख |
| २) | खेळते भांडवल | रु.३.०० लाख | --- |
| ३) | बील डिस्काऊंटींग | रु.१.०० लाख | --- |
| | एकूण कर्ज | रु.९.०० लाख | रु.५.०० लाख |

(**टिप**- रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलर क्रमांक १२ दिनांक १.७.२०१५ नुसार वरील सर्व खाती समुह योजनेंतर्गत अनुत्पादक ठरतात तरी देखील प्रत्यक्ष अनुत्पादक असलेल्या मुदत कर्ज खात्यासच एकरकमी कर्ज परतफेड योजनेची सवलत मिळेल.)

| | |
|---|---|
| D-१ चे मुद्दल :- | रु.५.०० लाख |
| अधिक | |
| D-१ चे येणे व्याज :- | रु. १.०० लाख |
| D-१ चे एकूण येणे :- | रु.६.०० लाख (अ) |
| अधिक | |
| अ. जाहीरात खर्च :- | रु.०.१० लाख |
| ब. विमा खर्च :- | रु.०.०५ लाख |
| क. न्यायालयीन बाबीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च :- | रु. ०.३५ लाख |
| एकूण खर्च रक्कम :- | रु. ०.५० लाख |
| एकूण येणे :- | रु. ६.५० लाख (ब) |
| वजा | |
| D-१ चे नंतर बँकेत भरणा केलेली रक्कम :- | रु. १.५० लाख |
| तडजोड रक्कम :- | रु. ५.०० लाख (क) |

**टीप**:-

**१)** वर कलम (अ) मधील रक्कमेच्या ५% रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे.

२) कर्जदाराच्या मृत्युची तारीख ही दिनांक ३१ मार्च, २०१६ किंवा त्यापूर्वीची असावी.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.02.26 15:17:35 +05'30'

**(रमेश शिंगटे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन